
# ४. रे थांब जरा आषाढघना

■ **बा. भ. बोरकर** (१९१० ते १९८४) :

श्रेष्ठ कवी, कादंबरीकार, ललित लेखक, कथाकार. 'पद्‌मश्री' या सन्मानाने भारत सरकारकडून गौरवान्वित. कवितेचे संस्कार लहानपणापासूनच. निसर्ग आणि प्रेम हे त्यांच्या कवितेचे मध्यवर्ती विषय आहेत. बोरकरांच्या कविता निसर्गप्रतिमांनी संपन्न आहेत. तीव्र संवेदनशीलता हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व नादमयता हा त्यांच्या काव्याचा विशेष आहे. १९६० साली त्यांच्या तोपर्यंतच्या सर्व कवितांचा संग्रह 'बोरकरांची कविता' या नावाने प्रकाशित झाला. त्यांचे 'गितार', 'चैत्रपुनव', 'चांदणवेल', 'कांचनसंध्या', 'अनुरागिणी', 'चिन्मयी' हे काव्यसंग्रह; 'कागदी होड्या', 'घुमटावरले पारवे', 'चांदण्याचे कवडसे', 'पावलापुरता प्रकाश' हे लेखसंग्रह, तसेच 'मावळता चंद्र', 'अंधारातली वाट', 'भावीण', 'प्रियदर्शिनी', 'समुद्रकाठची रात्र' इत्यादी ललित साहित्याची पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'सासाय' या कोंकणी कवितासंग्रहाला साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

निसर्गसौंदर्याने ओथंबलेल्या 'रे थांब जरा आषाढघना' या कवितेत काव्यही तितकेच ओतप्रोत भरलेले आहे. आषाढमासातील पावसाने निसर्गाला चहूबाजूने हिरवाईच्या नाना छटांनी नटवलेले आहे. हे निसर्गसौंदर्य अनुभवायचे असेल तर आषाढमेघाने क्षणभर थांबावे आणि निसर्गात त्यानेच घडवलेली रंगीबेरंगी जादुई किमया पाहण्याची संधी आपणाला द्यावी असे कवीला वाटते. आषाढमेघ थांबला तर लालसर मातीतील हिरवीगार शेते, शेतात चाललेली औते, वेळूंची बेटे, फुललेला केवडा, सोनचाफा, लाजरी जाई हे निसर्गसौंदर्य मनसोक्त पाहता येईल. रत्नजडित पंखांच्या फुलपाखरांचे थवे, पाण्यात सळसळणाऱ्या मासोळ्या आणि रात्रीच्या मिट्ट काळोखात चमकणारी काजव्यांची प्रकाशफुले यांच्याशी सुखसंवाद साधता येईल असे कवीला वाटते.

निसर्गाच्या विविध घटकांमधून डोकावणाऱ्या मानवी भावभावनांमुळे कवितेतील वातावरण अधिक सजीव आणि चैतन्यमय झाले आहे. अभिव्यक्तीच्या आवश्यकतेनुसार कधी संस्कृत तर कधी ग्रामीण बोलीतील शब्दांची गोड रूपे वापरून कवीने या रचनेत निर्माण केलेल्या माधुर्याचा आस्वाद घेताना आपण चकित होऊन जातो.



रे थांब जरा आषाढघना
बघुं दे दिठि भरुन तुझी करुणा

कोमल पाचूंचीं हीं शेतें
प्रवाळमातीमधलीं औतें
इंद्रनीळ वेळूंचीं बेटें
या तुझ्याच पदविन्यासखुणा

रोमांचित ही गंध-केतकी
फुटे फुलीं ही सोनचंपकी
लाजुन या जाईच्या लेकी
तुज चोरुन बघती पुन्हापुन्हा

उघड गगन, कर घडिभर आसर
आणि खुलें कर वासरमणि-घर
वाहूं दे या तव किमयेवर
कोवळ्या नव्या हळदुव्या उन्हा

कणस भरू दे जिवस दुधानें
देठ फुलांचा अरळ मधानें
कंठ खगांचा मधु गानानें
आणीत शहारा तृणपर्णां

आश्लेषांच्या तुषारस्नानीं
भिउन पिसोळीं थव्याथव्यांनीं
रत्नकळा उधळित माध्यान्हीं
न्हाणोत इंद्रवर्णांत वना

काळोखाचीं पीत आंसवें
पालवींत उमलतां काजवे
करुं दे मज हितगूज त्यांसवें
निरखीत जळांतिल विधुवदना

(चैत्रपुनव)

## कृती

**(१) (अ) कारणे शोधा.**

(१) कवी आषाढघनाला थांबायला सांगतात, कारण............

(२) कवीने आषाढघनाला घडीभर उघडण्यास सांगितले, कारण............

**(आ) खालील वर्णनासाठी कवितेत आलेले शब्द लिहा.**

(१) शेतातील हिरवीगार पिके-

(२) पोवळ्यांसारखी लाल कणीदार माती-

(३) वेळूंच्या बेटांचे वर्णन करणारा शब्द-

(४) फुलपाखरांच्या पंखांवरील रत्नासारखे तेज दर्शवणारा शब्द-

**(इ) एका शब्दात उत्तर लिहा.**

(१) रोमांचित होणारी-

(२) नव्याने फुलणारी-

(३) लाजणाऱ्या-

**(ई) कृती करा.**

(१) **कवीने आषाढघनाला करायला सांगितलेली कामे**

(२) **आषाढघन घडीभर थांबल्यावर घडणाऱ्या गोष्टी**

**(२) जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) काळोखाचीं पीत आंसवें | (अ) पाऊस उघडला तर पाण्यातील चंद्रबिंब पाहत |
| (२) पालवींत उमलतां काजवे | (आ) ओलसर वातावरणातील मिट्ट काळोखाचे दु:ख अनुभवत |
| (३) करुं दे मज हितगूज त्यांसवें | (इ) वृक्षपालवीत उघडमीट करत चमकणाऱ्या काजव्यासोबत |
| (४) निरखीत जळांतिल विधुवदना | (ई) मला गुजगोष्टी करू दे |

**(३) खालील ओळींचा अर्थ लिहा.**

कणस भरू दे जिवस दुधानें
देठ फुलांचा अरळ मधानें
कंठ खगांचा मधु गानानें
आणीत शहारा तृणपर्णां

**(४) काव्यसौंदर्य.**

आश्लेषांच्या तुषारस्नानीं
भिउन पिसोळीं थव्याथव्यांनीं
रत्नकळा उधळित माध्यान्हीं
न्हाणोत इंद्रवर्णांत वना, या ओळींतील काव्यसौंदर्य स्पष्ट करा.

**(५) रसग्रहण.**

**खालील ओळींचे रसग्रहण करा.**

रे थांब जरा आषाढघना
बघुं दे दिठि भरुन तुझी करुणा
कोमल पाचूंचीं हीं शेतें
प्रवाळमातीमधलीं औतें
इंद्रनीळ वेळूंचीं बेटें
या तुझ्याच पदविन्यासखुणा
रोमांचित ही गंध-केतकी
फुटे फुलीं ही सोनचंपकी
लाजुन या जाईच्या लेकी
तुज चोरुन बघती पुन्हापुन्हा

**(६) अभिव्यक्ती.**

(अ) आषाढातील पावसाचा तुम्ही घेतलेला एखादा अनुभव शब्दबद्ध करा.
(आ) 'आषाढघनाचे आगमन झाले नाही तर...' या विषयावर निबंध लिहा.

**उपक्रम :**

(अ) पाच निसर्गकवितांचे संकलन करा आणि त्याचे वर्गात प्रकट वाचन करा.
(आ) पावसाशी संबंधित पाठ्यपुस्तकाबाहेरील पाच कवितांचे सादरीकरण करा.

- **तोंडी परीक्षा.**

**'रे थांब जरा आषाढघना' या कवितेचे प्रकट वाचन लयीत करा.**